# जिल्हा परिषद काम वाटप समिती व त्याची कार्यपध्दती

## काम वाटप समिती :-

ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील दि. ८ मे, २००७ चे शासन निर्णयानुसार सहकारी मजूर सहकारी संस्था व सुशिक्षीत बेरोजगार अभियंता यांचेमार्फत कार्यान्वित होणाऱ्या कामांचे वाटप करणेसाठी जिल्हानिहाय काम वाटप समिती स्थापन करणेत आलेली आहे. सदर समितीची रचना खालील प्रमाणे

| | |
|---|---|
| १) मा.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद - | अध्यक्ष |
| २) मा.कार्यकारी अभियंता, (बांधकाम) जिल्हा मुख्यालयात कार्यरत | सदस्य सचिव |
| ३) मा.कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) (सर्व) | सदस्य |
| ४) मा.कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग | सदस्य |
| ५) मा.कार्यकारी अभियंता (लघु पाटबंधारे) (सर्व) | सदस्य |
| ६) मा.जिल्हा उप निबंधक | सदस्य |

सदस्य सचिव यांचे अखत्यारीतील लेखापाल / कार्यालयीन अधिक्षक हा त्यांना मदतनीस राहिल.

**❖सदर समितीची कार्यपध्दती खालील प्रमाणे**

१) सदर काम वाटपासाठीची सभा प्रत्येक महिन्यास घेतली जाते व कामाच्या उपलब्धतेनुसार जादा बैठक घेतल्या जातात.

२) सदर सभेची नोटीस सर्व स्थानिक वर्तमान पत्रामधून, मजूर संस्था संघ व सुशिक्षीत बेरोजगार संघटनेला केली जाते.

३) सभेकरिता ज्या ग्रामपंचायती काम करणार नाही अशा कामांची यादी सर्व तालुक्यातील ग.वि.अ., उप अभियंता (बांधकाम व ग्रापापू) तसेच प्रकल्प शाखेकडून प्राप्त करून घेतली जातात.

४) प्राप्त कामांची वर्गवारी ३३:३३:३४ प्रमाणे करुन त्यानुसार नोटीस बोर्डावर कामांची यादी प्रसिध्द केली जाते.

५) प्रथम मजूर सहकारी संस्थेची काम वाटप सभा घणेत येते यामध्ये मजूर संस्थांना प्राप्त झालेल्या कामांची नावे वाचन करुन मजूर संघाचे मागणी प्रमाणे कामांचे वाटप केले जाते. जर एका कामास जादा मागणी असेल तर त्या कामाचे वाटपाकरिता लॉटरी पध्दतीचा अवलंब करुन कामाचे वाटप केले जाते.

६) यानंतर सुशिक्षीत बेरोजगार अभियंता यांची सभा घेवून त्यांना वाटप करावयाच्या कामांची नावे वाचन करुन त्यांचे मागणी प्रमाणे कामांचे वाटप केले जाते. जर एका कामास जादा मागणी असेल तर त्या कामाचे वाटपाकरिता लॉटरी पध्दतीचा अवलंब करुन कामाचे वाटप केले जाते.